CS (MAIN) EXAM, 2010

No. 237

D-DTN-K-NSB

MARATHI

Paper II

(Literature)

Time Allowed : Three Hours | *Maximum Marks : 300*

INSTRUCTIONS

Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.

The number of marks carried by each question is indicated at the end of the question.

Answers must be written in Marathi.

SECTION A

1. पुढीलपैकी कोणत्याही *तीन* उताऱ्यांचे रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : *20×3=60*

(a) केसोबास ते कवणिये गाविंचे हें नेणिजे : ।। एकी वासना : । पापदंडी रामपुरीचे : ।। ते विद्वांस व्याख्याते : एक दीं ते भटोबासांपासिं आले : भीक्षा केली : भटोबासां थोर पढियेति : भटोबासांचां सन्निधानि राहीले : ।।

Optional Province · optionalprovince.com

(b) "कालिदीस जगाचें काव्यांतले स्वरूप ठाऊक होतें, पण शुक्रवारांत राहावयास गेल्यापासून खरें स्वरूप कळलें. आईबापांवरील तिचा विश्वास उडाला होता. त्यांच्या प्रेमाच्या मर्यादा तिल्या कळल्या होत्या. ज्या मुलीच्या योगानें आपली जगांत मानखंडना होणार असली मुलगी बापाला नको होती. मुलगी बिघडली तरी आपलीच हें आईला देखील अगदीं नियमित मर्यादेपर्यंतच खरें होतें; आईला आपल्या प्रतिष्ठित आयुष्यक्रमाची चाड होती. त्यामुळे शुक्रवारांत असतां तिला ती भेटावयास गेली नाहीं.

(c) "अरे पण तिनें असं काय केलंय ? तिला काय जादूटोणा येत असता तर ती जीव घेऊन अशी बाहेर आलीच असती कशाला ? येवढं दांडगं रूप असूनबी वयाच्या तेराव्या वर्षापासून बापासारख्या रामरावाबरोबर सतीसावित्रीसारखी ऱ्हायली. गुणाने थोर होती, म्हणून तो दुनियेचा बिलंदर म्हातारा सर्व सोडून इच्या भजनीं लागला. हिनं ठरवलं असतं तर वाडा धुवून नेला असता. दौल्याला येडा होऊन फिरूं दिला नसता. शाळंत घातला असता, अन् राजरजवाडा केला असता. पैशाला भाळून कोणीही त्याला पोर दिली असती."

Optional Province · optionalprovince.com

(d) "अशीच धर्माची व माझी लगट झाली व मलाही त्याचा नाद लागला कारण चांगल्याजवळ बसलं कीं चांगलंच व्हतं असं वाटायचं व वाईटाजवळ बसलं की वाईटच व्हतं म्हणून त्याची संगत धरली. आता धर्माला माझं थोडंबहुत समजलं व्हतं म्हणून तो मला घरी म्हातारीला सारं काही पटवून सांगून कधीमधी जेऊ घालायला लागला मला खरंच साधलं गड्या वाटलं. एकतर संगतही चांगली व खायालाबी मिळतंय."

2. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील समाजप्रबोधनप्रक्रियेला महात्मा जोतिराव फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' मधील विचारांमुळे कशी चालना मिळाली याचा परामर्श घ्या. *60*

3. 'ब्राह्मणकन्या' आणि 'जन हे वोळतु जेथे' या कादंबऱ्यांतील जीवनदर्शनाविषयी सविस्तर विवेचन करा. *60*

4. ग्रामीण परिसरातील स्त्रियांच्या खडतर जीवनाचे वास्तव चित्रण 'शिळान' या कथासंग्रहात कसे करण्यात आलेले आहे याचा सविस्तर परामर्श घ्या. *60*

Optional Province · optionalprovince.com

SECTION B

5. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** पद्यखंडांचे रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : *20×3=60*

(a) पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।
पतितपावन नव्हेसि म्हणुनी जातों माघारा ॥१॥
घ्यावें तेव्हां द्यावें ऐसा अससी उदार ।
काय धरूनि देवा तुझें कृपणाचें द्वार ॥२॥
सोडी ब्रीद देवा आतां नव्हेसी अभिमानी ।
पतितपावन नाम तुझें ठेवियलें कोणी ॥३॥
झेंगट घेउनी हातीं दवंडी पिटीत तिन्ही लोकीं ।
पतितपावन देवा परी तूं मोठा घातकी ॥४॥
नामा म्हणे देवा तुझें न लगे मज कांहीं ।
प्रेम असोंदे चित्तीं म्हणूनि लागतसे पायीं ॥५॥

(b) बालतरू हे चोंहिकडे
ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंहि
मुक्तामणि उधळुनि देई !
बुदबुद-लहरी-फुलवेली
फुलव सारख्या भंवताली
सौंदर्यें हृदयामधलीं

Optional Province · optionalprovince.com

(c) चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला

(d) मृगाच्या वादळांतून मीं ऐकले
मातींतील महापुरुषांचे आर्त निःश्वास;
आणि विजेच्या कडकडत्या प्रकाशांत
पाहिले मानव पोलादी कण्यांचे
जीवनाच्या ॲसिडांत विरघळून जातांना;
पाहिली मानवता दोन पेडांच्या
जुनाट जात्यानें दळीत बसलेली
आपल्याच पोरांना आपल्याच हातांनी
आणि गात चिलयाच्या ओव्या;
नाहीं रे उजाडत.

6. "राजकीय जीवनाप्रमाणेच शाहिरी कवनांतून आविष्कृत झालेल्या सामाजिक जीवनांतहि अपुरेपणा जाणवतो – एकांगीपणा जाणवतो." या विधानाच्या संदर्भात 'पैंजण' या संग्रहातील काव्यातील सामर्थ्य आणि मर्यादांविषयी ऊहापोह करा. *60*

Optional Province · optionalprovince.com

7. 'विशाखा' आणि 'मृद्‌गंध' या कवितासंग्रहांतून राष्ट्रीय स्पंदनांचे आणि सामाजिक जाणिवांचे स्वरूप कसे दिसून येते याचा परामर्श घ्या. *60*

8. आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने १९६० नंतरच्या मराठी कवितेतील बदलाचे चित्र 'संध्याकाळच्या कविता', 'जाहीरनामा' आणि 'या सत्तेत जीव रमत नाही' या कवितासंग्रहांत कसे आढळते याविषयी सविस्तर विवेचन करा. *60*

Optional Province · optionalprovince.com